# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

**डॉ. प्रभाकर देसाई**
एम्.ए., पीएच् डी.
**संचालक**


संदर्भ : विविमं/२०१७–१८/९१२ तातडीचे/कालमर्यादेचे दि. ०७/०६/२०१८

प्रति,
मा. प्राचार्य / मा. संचालक
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न (वसतीगृह असलेली) सर्व
महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था.

विषय : महाविद्यालयाच्या परिसरातील उपाहारगृहे आणि वसतिगृहांतील स्वयंपाकगृह स्वच्छता व अन्नपदार्थांच्या दर्जाबाबत.

महोदय/महोदया,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संलग्नित महाविद्यालयातील उपाहारगृहांमध्ये जे अन्नपदार्थ दिले जातात ते आरोग्यवर्धक असावेत आणि स्वयंपाकगृहांची स्वच्छता काटेकोरपणे पाळली जावी ही महाविद्यालय प्रशासनाची जबाबदारी आहे, तसेच महाविद्यालय परिसरातील खानावळीतील स्वयंपाकगृहेही अस्वच्छ असल्याच्या विद्यार्थ्यांच्या तक्रारी विद्यापीठ प्रशासनाकडे प्राप्त होत आहेत. याबाबत लोकप्रतिनिधींकडूनसुद्धा प्रश्न उपस्थित होत आहेत.

महाविद्यालयातील उपाहारगृहांमध्ये व वसतिगृहातील खानावळीत आरोग्यवर्धक अन्नपदार्थ उपलब्ध करून द्यावेत, पिण्यासाठी शुद्ध पाणी उपलब्ध असावे आणि स्वयंपाकगृहे निर्जंतूकीकरण केलेली असावीत, याबाबत महाविद्यालयाने सदैव दक्ष राहिले पाहिजे.

महाविद्यालयातील उपाहारगृहांमध्ये व वसतिगृहातील खानावळीत स्वच्छता व तेथील वापरण्याचे व पिण्याचे पाणी निर्जंतुक असावे तसेच स्वयंपाकगृहामध्ये स्वच्छता असावी याबाबत महाविद्यालय प्रशासनाकडून योग्य ती तपासणी व्हावी आणि याबाबतचा वस्तुनिष्ठ अहवाल विद्यार्थी विकास मंडळ कार्यालयास दि. १५ जून, २०१८ पर्यंत पाठवावा. कळावे, ही नम्र विनंती.

संचालक,(अतिरिक्त कार्यभार)
विद्यार्थी विकास मंडळ